# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३

## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. सुभाष देशमुख, कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सोलापूर औद्योगिक वसाहतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे निर्यात क्षम टॉवेल उत्पादन करणाऱ्या मुनोत गारमेंट टेक्स्टाईल व लगतच्या दोन छोट्या कारखान्यांना माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये लागलेल्या आगीत कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास येणे, माहे फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात दर्शन युनिफॉर्म आणि बालाजी स्पिनिंग मिल ला आग लागून १८ कोटींचे नुकसान झालेले दिसून येणे, दोन्हीही संस्थेमध्ये फायर ब्रिगेडची यंत्रणा सक्षम नसल्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत असल्याचे त्या सुमारास निदर्शनास देणे, या कारखान्यातील टॉवेल, सुताचे गठ्ठे अन्य यंत्र सामग्री आगीच्या भक्षस्थानी पडले असणे, याबाबतच्या अहवालानुसार अद्याप टावेल कारखान्याला संपूर्ण नुकसान भरपाई मिळालेली नसणे, १९९३ मध्ये एमआयडीसी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतर करूनही अद्याप येथे मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध नसणे, त्यात येथे अग्निशामक केंद्र नसल्याने या एमआयडीसीतील अनेक कारखान्यांना आग लागल्याबरोबर अग्निशामन (बंब) गाडी वेळेत न आल्याने कोट्यावधी रुपयाची नुकसान होऊन अनेक कंपन्या नष्ट होत असणे, त्यामुळे एमआयडीसीत आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा सुविधा देण्यासाठी अनेक कारखानदारांनी शासन आणि महानगरपालिकेकडे वारंवार मागणी करून ही याची प्रशासनाने दखल न घेणे, सोलापूर शहरातील ही एमआयडीसी देशात आणि परदेशात कापड उद्योग क्षेत्रात अग्रभागी असून येथे हजारो कामगारांना येथे काम मिळत असणे, एमआयडीसी आणि महानगरपालिका यांच्यात समन्वय नसल्याने अग्निशामन केंद्र कुठे उभारायचे हा प्रश्न वर्षानुवर्षी प्रलंबित असणे, त्यामुळे या एमआयडीसीची सर्वत्र दुर्दशा होत असणे, त्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग आणि नगर विकास विभागाने वेळीच दखल न घेतल्यास अनेक प्रलंबित प्रश्न गंभीर होत असणे, त्यामुळे येथील उद्योजक आणि कामगार तीव्र नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

अप्रकाशित प्रत

(२) **सर्वश्री. सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शिवाजीनगर येथील एसटी चे बसस्थानक मेट्रोच्या कामामुळे जुना पुणे-मुंबई रस्त्यालगत वाकडेवाडी येथील शासकीय दुध योजना (आरे) च्या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात आले असणे, शिवाजीनगर बस स्थानकाची जागा मेट्रोचे काम पूर्ण होईपर्यंत महामेट्रोने तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेणे, सदर जागा ताब्यात घेताना एसटी महामंडळ व महामेट्रो ने सामंजस्य करार करून महामेट्रोने शिवाजीनगर बस स्थानक बांधून द्यावे असा निर्णय या करारातून होणे, सध्या मेट्रोचे काम पूर्ण झालेले असणे, परंतु सामंजस्य करारानुसार ठरल्याप्रमाणे अद्यापही शिवाजीनगर बस स्थानकाचे काम सुरु झालेले नसणे, यामुळे प्रवाशी नागरिकांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होणे, तसेच वाकडेवाडी येथे स्थलांतरीत केलेल्या बस स्थानकामुळे जुना पुणे—मुंबई मार्गावरती सतत वाहतूक कोंडी होणे, त्याठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणे, नागरिकांच्या व प्रवाशांच्या सोयीसाठी जुने शिवाजीनगर बसस्थानकाच्याच जागी नवीन बसस्थानक तयार करून त्याठिकाणाहून बस सेवा पुन्हा पूर्ववत सुरू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर जिल्हयातील काटोल येथील मे.नानक कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेनी नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत संगनमत करून करोडो रूपयांच्या बांधकामाची कामे मिळविणे,या बांधकामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करणे, संस्थेनी या बांधकामासाठी जिल्हा परिषदेत ठेवलेली अनामत रक्कम कोणत्याही अधिकाऱ्यांची परवनगी न घेता मुदतीच्या अगोदरच खोट्या स्वाक्षरी करून संस्थेनी उचल करणे, या करोडोच्या व्यवहारात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अंधारात ठेवण्यात येणे, झालेल्या करोडो रूपयांच्या गैरप्रकाराची तक्रार जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग,लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागपूर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणे,नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे.नानक कंस्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेला काळया यादीत टाकण्यात यावे याबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी कक्ष अधिकारी (बांध-२) ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येणे, दोन महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा अद्यापही सदर प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामुळे

अग्रिम प्रत

नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कक्ष अधिकारी ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी पाठविलेला प्रस्तावावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(४) **सर्वश्री. सुनील राणे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मुंबईतील बंद पडलेल्या ५८ गिरण्यातील कामगारांसाठी व त्यांच्या वारसासाठी सवलतीच्या दरात घरे कामगारासाठी करुन देण्याच्या दृष्टिने आता पर्यंत सन २०१२, २०१६ व सन २०२० अशी तीन वेळा १७ हजार घरांची सोडत देणे, उर्वरित १ लाख ७० हजार गिरणी कामगार हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत असून बंद पडलेल्या गिरण्याच्या जमिनीवर गिरणी कामगारांना म्हाडाने बांधलेल्या घरापैकी ६९२५ घराची पहिली सोडत दिनांक २८ जून, २०१२ मध्ये काढण्यात आली व घराचे वाटप केले परंतू सन २०२० मधील सोडतीपैकी घराचे वाटप अजूनही झालेले नसणे, कोनगाव, पनवेल येथील घरासाठी डिसेंबर, २०१६ मध्ये सुमारे २ हजार घरासाठी पैसे भरून ही अनेकांना घरे मिळालेले नसणे, गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठी व गिरणी कामगाराच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गिरणी कामगार संघटना गेल्या अनेक वर्षापसून संघर्ष करीत असून, अर्ज केलेल्या १ लाख ७० हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी ठोस आराखडा तयार एन टी सी मील च्या गिरण्याची जमिन घरासाठी उपलब्ध करुन देणे, श्रीनिवास आणि श्रीराम मिलच्या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देणे, स्वानच्या तीन्ही गिरण्यातील कामगारांना लवकर घरे देणे, खटाव मिलची जमीत डी.सी.आर प्रमाणे घरांसाठी देणे, कोनगाव पनवेल येथील घरे २ हजार ४१७ गिरणी कामगारांना वितरीत करणे, बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलच्या कामगाराची पात्रता निश्ति करुन घरांचा ताबा देणे, न्यू ग्रेट हिंदूस्थान व मुकेश मिलची जागा डीसीआर प्रमाणे घरासाठी देणे, गिरण्या चाळीतील रहिवाशांचे पूनर्वसन त्वरीत करणे त्यामुळे तातडीने दखल देऊन गिरणी कामगारांना न्याय देण्याची मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(५) **श्री. महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाराची आणि गुलालाची उधळण करत करणे, याकरिता पिवळया व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्यांची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर

करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्यांचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युग्त करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मानुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(६) **श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मागील शासनाने राज्यात महात्मा फुले कर्ज माफी ही योजना सुरु करणे, यासाठी २ लाख रुपयांपर्यंत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा करुन बऱ्याच शेतकऱ्यांना हे ५० हजार रुपये अनुदानाचे वाटप केलेले असणे, ज्या शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असून आणि जास्त असलेले कर्ज जर शेतकऱ्यांनी भरले तर त्या शेतकऱ्यांचे २ लाख रुपये कर्ज सुध्दा माफ करण्याचा निर्णय होऊन सुध्दा व बऱ्याच शेतकऱ्यांनी २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले कर्ज भरुन सुध्दा त्यांना अद्यापही शासनाकडून २ लाख रुपये देण्यात न येणे, त्यावरील व्याजाचा भार शेतकऱ्यावरती पडणे, त्यावरील व्याज सुध्दा अद्यापही घेण्यात येत असणे, तसेच या योजनेचा लाभ अद्यापही देण्यात आलेला नसणे, परिणामी शेतकऱ्यांना सोसायटीमार्फत मिळत असणारे पिक कर्ज सुध्दा थांबविण्यात आलेले असणे, परिणामी शेतकरी दुहेरी संकटात सापडला असणे, या संदर्भात चौकशी करुन नियमित कर्ज परत फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्यापोटी तसेच २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले रक्कम ज्या शेतकऱ्यांनी भरलेली आहे अशा शेतकऱ्याचे २ लाख रुपये कर्ज माफ करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(७) **श्री. सुभाष धोटे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शासनाने भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या यादीस नुकतीच अर्थात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास

अप्रकाशित प्रत

मंजुरी दिली असणे, सदरहू यादीत फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थी असल्याने जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील लाभार्थ्यांवर अन्यायाची भावना व्याप्त असणे, भटक्या जाती जमाती, इतर मागास बहुजन कल्याण विभागाने दिनांक २४ जानेवारी, २०१८ च्या शासकीय परिपत्रकानुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल देण्याचा निर्णय घेणे, त्यानुसार दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ च्या शासकीय परिपत्रकानुसार फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थ्यांना समाविष्ट केले गेले मात्र जिल्हयातील अन्य ११ तालुक्यात एकाही लाभार्थ्याला या योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले नसल्याची बाब उघडकीस येणे, ग्रामपंचायतीमधून यशवंतराव चव्हाण घरकुल, धनगर घरकुल, शबरी घरकुल योजनेची यादी मागविण्यात येते, मात्र मंजुरी देताना फक्त आपल्या क्षेत्रातील, मर्जीतील लोकांना घरकुल मंजूर करून ग्रामपंचायतीने तयार केलेल्या यादीतील लोकांना वगळण्यात येत असल्याच्या असंख्य तक्रारी असणे, सदरहू प्रकरणी चौकशी गठीत करून या योजनेतून वगळण्यात आलेल्या जिल्हयातील अन्य ११ तालुक्यातील लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनामार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने या घटकांचा शासनाप्रती वाढता असंतोष, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(८) **सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, अतुल भातखळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“नवी मुंबई सिडको लि., ने विकसित केलेल्या खारघर नोडला दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केला गेला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोड विकसित झाल्यापासून एकही दारू विक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत शैक्षण हब म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या खारघर परिसरात संबंधित विभागामार्फत दारू विक्रीचा परवाना दिला गेला असणे, उक्त परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी अनेक आंदोलने व निवेदने देवून सुद्धा दारूविक्रीचा परवाना दिलेल्यावर कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होवून नागरिकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

(९) **श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती मालोजीराजे यांचे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात इंदापूर शहरात वास्तव्य असणारे शिवभारत या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा समकालीन इतिहास असणारे संदर्भ ग्रंथ यामधील उल्लेखात हा भुईकोट किल्ला (जुनी तहशील कचेरी) हे वास्तव्याचे ठिकाण असणे, प्रशासकीय दृष्टीने सदरील जागा ही महसूल विभागाकडे दप्तरी नोंद असणे, महसूल विभागाच्या नोंदीमध्ये मालोजीराजांच्या इतिहासाच्या बाबींचा उल्लेख असणे, या किल्ल्या समोर ग्रामदैवत इंद्रेश्वराचे मंदिर आजही असणे, मालोजीराजे सकाळी आपला दिनक्रम अमरेश्वराच्या दर्शनाने करत असत असाही संदर्भ शिवभारत या शिवरायांच्या राज्यकारभारातील समकालीन लिहला गेलेल्या एकमेव अस्सल साधनात असणे, म्हणुन इतिहासाची साक्ष असणाऱ्या इंदापुर शहरातील इतिहासाला उजाळा देण्यासाठी या आजची जुनी कचेरी म्हणजेच मालोजी राजे यांच्या गढीचे शासनाने संवर्धन करून जुने बुरुज गाव वेस बुह्यरे यांचे पुनर्जीवन करून या कचेरीच्या जागेतच छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे स्मारक करून मालोजी राजेंच्या पादुका यांच्या साठीही दगडी मूळ स्वरूपाचा चबुतरा उभारून मालोजीराजे भोसले यांचे जीवनचरित्र महाराष्ट्रासमोर आणण्यासाठी पर्यटन विभागाकडून करणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अस्थायी प्रत

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) कृषि मंत्री : (क)** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महिला व बालविकास मंत्री** : महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) सर्वश्री. बळवंत वानखडे, मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी पदोन्नती मधील आरक्षण लागू करण्यास शासन निर्णय दिनांक २५ मे, २००४ रद्द केलेला असणे, एम. नागराज विरूद्ध भारत सरकार (२००६) या निर्णयानुसार मागासलेपणा,अपर्याप्त प्रतिनिधित्व व प्रशासनाची कार्यक्षमता यावर आधारित आकडेवारीचा नविनतम अहवाल महाराष्ट्र शासनाने सादर न केल्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्यात आलेला असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरूद्ध शासनाने महाराष्ट्र शासन विरूद्ध विजय घोगरे (**SLP No.**२८३०६/२०१७) ही विशेष अनुमती याचिका माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयास सादर केलेली असणे, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी मागासलेपणा सिद्ध करण्याची अट रद्द केली व इतर दोन अटींप्रमाणे अभ्यास अहवाल तयार करून त्यानुसार पदोन्नती मधिल आरक्षण वैध ठरविले असणे, केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी पदोन्नतीमधिल आरक्षण लागू करण्यासाठी मार्गदर्शक सुचना जारी केलेल्या असणे त्यावर शासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नसणे दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांचा पदोन्नती मधिल ३३% वाटा खुल्या प्रवर्गात बेकायदेशिररित्या वर्ग केलेला असणे , परंतु अशाप्रकारचे कोणतेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले नसणे अथवा मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने दिलेल्या नसणे, दिनांक २८ जानेवारी, २०२२ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा संख्यात्मक डाटा गोळा करून पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्याचे अधिकार राज्य शासनास असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले असणे, अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा अहवाल

अप्रमाणित प्रत

शासनाने तयार केला असणे व तो सर्वोच्च न्यायालयात सादर केला असणे, परंतु केवळ महाराष्ट्र शासनाची याचिका क्र.२८३०६/२०१७ निकाली निघाली नाही या कारणाखाली अजूनपर्यंत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना / अधिकाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात आले नसणे व सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांना दिनांक २५ मे, २००४ च्या सेवाज्येष्ठतेची अट घालून त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती मिळणे सुद्धा बंद झाले असणे, त्यामुळे सन २०१७ ते २०२२ या कालावधीत राज्यातील जवळपास ८०,००० अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जाती व विशेष मागास प्रवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित ठरले असणे, त्यातील बरेच कर्मचारी पदोन्नतीविनाच निवृत्त झाले असणे, यामुळे राज्यातील मागासवर्गीय कर्माचाऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, अमित देशमुख, संग्राम थोपटे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, झीशान सिद्दिकी, कुणाल पाटील, अमित झनक, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ मुंबई–सुंदर मुंबई या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असणे, सफाई कर्मचारी वारसा हक्क पद्धतीने पिढ्यान पिढ्या सफाई कामगार म्हणून कार्यरत असणे, विशेषतः कोविड काळात त्यांनी दिलेल्या सेवेला विशेष महत्व असणे, सेवेत कार्यरत असेपर्यंत त्यांना महापालिकेच्या वसाहतीमध्ये घरे राहण्यासाठी उपलब्ध होणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर घर खाली करण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येणे, सेवानिवृत्तीनंतर त्यांची मुंबईमध्ये राहण्याची पर्यायी व्यवस्था नसणे, त्यामुळे सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवीत अशी मागणी सफाई कर्मचाऱ्यांकडून वारंवार होत असणे, या मागणीच्या पाठपुरावा करण्यासाठी अधिवेशन काळात वारंवार प्रश्न उपस्थित करणे, सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळवीत यासाठी शासन स्तरावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहात देणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, आश्रय योजना व श्रमसाफल्य योजनेत असणाऱ्या विरोधाभासामुळे सफाई कर्मचारी संभ्रमात असणे, त्यामुळे सफाई कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(३) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या रायगड जिल्हयातील न्हावा-शिवडी सेतु प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावा, गव्हाण, घारापुरी हद्दीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे व मच्छिमार बांधवांचे पुनर्वसन अद्यापपर्यंत झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस आले असणे, उक्त प्राधिकरणाने उक्त प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत ग्रामस्थांना याद्या तयार करण्यास सांगितले असणे, प्रकल्पबाधित मच्छिमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यासाठी ९ याद्या तयार करण्यात आल्या असणे, उक्त यादीतील काही ग्रामस्थांना नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप करण्यात आले असून बहुतांशी प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छिमारांना अद्यापही नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले नसणे, उक्त सेतू मार्गामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकास निधी देण्याचे दिनांक १५/१०/२०२० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये मान्य केले असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर ग्रामपंचायतींना निधी वितरीत केला गेला नसणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने व भ्रमणध्वनीद्वारे प्राधिकरणाला अवगत करूनसुद्धा प्राधिकरणामार्फत कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे सेतु मार्ग प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकरी व मच्छिमार बांधवांमध्ये उक्त प्राधिकरणाबाबत प्रचंड चिड निर्माण होत असणे, त्यामुळे सेतु प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छिमार बांधवांना तातडीने नुकसान भरपाईचे वाटप करण्याबाबत तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकासनिधी देण्याबाबत शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

**(४) श्री. विनोद निकोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातून मुंबई - बडोदा सुपर फास्ट हायवे च्या कामासाठी जमीन भूसंपादन सुरु असणे, पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असणे, ज्या जमिनी भूसंपादन झालेल्या आहेत त्या अधिकतर आदिवासी शेतकरी बांधवांच्या असणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे सदरहू प्रकल्पात जमीन घोटाळा होणे, मोठ्या प्रमाणावर आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होणे, अधिग्रहित जमिनीचा मोबदला शासनाकडून मिळत असतानाही त्यात दलाल डल्ला मारत असणे, जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, बहुमोल वनसंपत्ती नष्ट होणे, पर्यावरण प्रेमींनी आक्षेप घेणे, पालघर जिल्ह्यातील वसई, वाडा, पालघर विशेषतः तलासरी, डहाणू या तालुक्यातून सदरहू हायवे जाणार असणे,

अप्रकाशित प्रत

सर्वच शेतकऱ्यांनी त्यास जमीन देण्यास विरोध करणे, ज्या ठिकाणी जमीन मोजणी पूर्ण झालेली आहे, त्या ठिकाणी मोबदला अतिशय तुटपुंज्या असणे, त्यास ही शेतकऱ्यांचा विरोध असणे, प्रस्तावित मुंबई - बडोदा महामार्गामुळे पालघर जिल्ह्यातील वनसंपत्तीची मोठी हानी होणार असणे, वसई ते तलासरी पर्यंतची सुमारे १८१ हेक्टर वनजमीन या महामार्गासाठी जाणार असणे, शिवाय सुमारे ५१ गावांतील शेतकरी बाधित होणार असणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांमध्ये पसरलेल्या तीव्र असंतोष लक्षात घेऊन शासनाने याची गंभीर दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(५) श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“जालना जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर पालखी मार्ग (एन एच ५४८ सी) या रस्त्याच्या कामाची रुपये २९७ कोटीची प्रशासकीय मान्यता दिनांक १ ऑगस्ट २०१७ रोजी मिळालेली असून या रस्त्याच्या कामातच पुलांचे काम समाविष्ट असणे, मात्र मेघा इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी व कार्यकारी अभियंता, उपअभियंता हे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्यामुळे संबंधित कंत्राटदार कंपनी व दोषी अधिकारी यांच्यावर शासनस्तरावर कठोर कारवाई करणे अपेक्षित असणे, या रस्त्यावरील मौजे श्रीष्टी ता.परतुर, जि. जालना व मौजे गंगासावंगी, ता. परतुर, जि. जालना येथील पुलाचे काम अपूर्ण असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असणे, पुलाचे काम पूर्ण न झाल्यामुळे येथील प्रवास अत्यंत धोकादायक बनला असणे, सन २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कसुरा नदीला पूर आला असून या पुरामध्ये एसटी महामंडळाची बस वाहून गेली असणे, या बसमध्ये २३ प्रवासी होते, सुदैवाने गावकऱ्यांच्या समयसूचकता व मदतीमुळे या बसमधील प्रवासी सुखरूप बचावले, मौजे गंगासावंगी येथील पुलाचे काम संबंधित शेतकऱ्याला मावेजा न मिळाल्यामुळे प्रलंबित असणे, येथील नदीपात्रातील काम सुरू करण्यास कोणतीही अडचण नसताना सदरील कंत्राटदार कंपनी शेतक-यांच्या नावाखाली काम करण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ करत असणे, तसेच मौजे श्रीष्टी येथील पुलासाठी संपादित जमिनीचा मावेजा सार्वजनिक बांधकाम विभाग देणार किंवा रस्ते विकास महामंडळ देणार या कारणामुळे काम प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(६) श्री. नितेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“नगर शहरातील रामवाडी परिसरातील गेल्या अनेक वर्षांपासून तेथील दलित समाजातील लोकांवर मुस्लिम लोकांनी अत्याचार करत असणे, तसेच तेथील दलित

अग्रिम प्रत

लोकांना रामवाडी वस्तीतून पलायन करण्यास भाग पाडणे, तसेच रामवाडी भागाचे नाव तेथील काही समाजकंटक हिमायतनगर करणे, सदरील सर्व जागा आर्मी कॅन्टोन्मेंटची असणे, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री नगर शहरातील अशोक लोंढे नामक व्यक्तीने औरंगाबाद चे नामकरण छत्रपती संभाजी महाराज झाले यासंदर्भात असणाऱ्या पोस्ट चे स्टेटस व्हॉट्सअ‍ॅप ला ठेवले यावरून मुस्लिम जमावाने त्यांच्यावर पूर्वनियोजित एकत्रित होऊन हल्ला करणे, आणि त्याच्या डोक्यात, पोटात व कानामागे तलवारीने वार करणे, त्यानंतर सदर जमाव अशोकच्या बहिणीच्या घरी जाऊन त्यांचा विनयभंग करून घरातील तोडफोड व त्यांना मारहाण करणे, त्यानंतर तेथून सर्व जमाव रोहित जगताप नावाच्या व्यक्तीच्या घरात घुसून त्यांना व घरातील महिलांना मारहाण करून त्यांचा विनयभंग करून घरातील मंदिराची आणि देवी देवतांची विटंबना करणे, त्यानंतर एक कार्यकर्ता हिंदुत्ववादी काम करणारा कुणाल भंडारी नामक व्यक्ती रस्त्याने जातांना घडलेली घटना बघत असताना थांबला तर हा पण हिंदुत्ववादी कामांमध्ये सक्रिय असतो असे म्हणून तेथील त्या जमावाने कुणालला देखील मारहाण करणे, तसेच त्यातील एका मौलानाने फोन कुणाल भंडारीच्या कानाला धरून बोलला की अफजल पैलवान सोबत बोलायला सांगितले परंतु कुणालने अफजल सोबत बोलायला नकार दिल्यानंतर तेथील जमावाने धारदार शस्त्राने कुणालच्या पोटात कोयत्याने वार करून लोखंडी रॉड ने मारहाण करणे, त्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री पुन्हा मुकुंद नगर मधील इमरान माव्या वाला याने रामनगर मध्ये येऊन याच जमावाला सोबत घेऊन राजू भोईटे नामक व्यक्तीला जबर मारहाण करून डोक्यात आणि चेहऱ्यावर रॉडचे वार करणे, सदर घटनेतील एक समीर शेख नावाचा एक मौलाना आहे जो या घटनेतील आरोपी आहे त्याच्या इंस्टाग्राम वरील पोस्ट सर्व हिंदू विरोधी असणे, तसेच आरोपी अफजल शेख नावाचा जो आरोपी आहे तो पोलिसांवरती दबाव तंत्राचा उपयोग करत मुस्लिम लोकांना,महिलांना एकत्रित करून पोलीस स्टेशन ला पाठवून पोलिसांवर दबाव आणणे, तसेच अफजल शेख मोठ्याप्रमाणात लव जिहाद,land जिहाद कारवायांमध्ये सक्रिय असणे, मुस्लिम मुलांना लव जिहाद, देशविरोधी कारवायांसाठी फंडींग करणे, घटनेतील सर्व आरोपींचा टोळी माफिया प्रमुख अफजल शेख हा असून याचा भाऊ मुदस्सर हा तेथील रामनगर भागाचा नगरसेवक असून याच्याच वडिलांनी शिवजयंती च्या दिवशी शेवगाव भागातील एका हिंदू कहार समाजाच्या मुलाला घरावर भगवे झेंडे लावले म्हणून मारहाण केलेली असणे,आणि पोलिसांनी कारवाही न करणे, तसेच इतकी गंभीर घटना घडलेली असतांना देखील काही आरोपींना अद्याप पोलिसांनी अटक केलेली नसणे, तसेच साल २०१७ ते २०१८ सुमारास नगर एसपी कार्यालय तोडफोड प्रकरणातील आरोपी अफजल शेख नावाच्या व्यक्तीने एफ.आय.आर मधून नाव वगळण्यासाठी स्थानिक पोलिसांना पैसे देण्याचा प्रयत्न करणे, तसेच संबंधित घटनेच्या विरोधात स्थानिक दलीत हिंदू नागरिकांनी नगर शहरात मोर्चा काढणे, परंतु मोर्चात काही मुस्लिम महिलांनी हिंदू दलीत महिलांना शिवीगाळ करणे, त्यानंतर हिंदू महिला पोलिसस्टेशन ला तक्रार द्यायला जाणे, मात्र पोलिसांनी एट्रोसिटी घेणे अपेक्षित असतांना त्या ठिकाणी साधी एन.सी. न घेणे, तसेच

अप्रमाणित प्रत

याबाबत कारवाही व्यवस्थित न झाल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन होणार असल्याचे पत्र शासनास हिंदुत्ववादी संघटनांनी देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व उपाययोजना.”

**(७) श्री.अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''मुंबई उपनगरातील अंधेरी (प) जूहू गल्ली येथील झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्प हा डिएचएफएल कंपनीच्या अंतर्गत असून सदर प्रकल्पामध्ये सुमारे ३६ सोसायटया व ५२०० पेक्षा अधिक झोपडपट्टीवासीयांचा परिशिष्ट २ तयार असणे, सदर विषयामध्ये किमान ५०० ते १००० घरे ही पुर्नविकासाकरिता तोडली असणे, गेल्या अनेक वर्षापासून तोडलेल्या घरांच्या घर मालकांना भाडे सुध्दा आकारण्यात आलेली नसणे, तसेच मोठया प्रमाणावर आपल्या घराबाहेर असलेल्या कुटूंबांची हेळसांड होणे, सदर प्रकल्प हा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून डिएचएफएल कंपनीच्या ईडीच्या प्रकरणामध्ये सदर विषय अडकला असणे, डिएचएफल कंपनी ही एनसीएलटी मधून दुसऱ्या एका कंपनीने ताब्यात घेऊन सुध्दा अद्यापपर्यंत सदर झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पाला चालना न मिळाल्यामुळे सदर गलिच्छ वस्तीमधील नागरीक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असल्यामुळे शासनाने सदर विषयामध्ये मध्यस्थी करुन स्वत: शासनाने सदर प्रकल्प आपल्या अखत्यारीमध्ये घेऊन सदर प्रकरणामध्ये असलेल्या सर्व भागधारकांशी चर्चा करणे, वाटाघाटी करुन सदर व्यवहार सुरळीतपणे करुन ५२०० पेक्षा अधिक झोपडपटटीवासीयांना स्वत:चे हक्काचे घर तयार करुन शासनानेच सदर प्रकल्प पुढे नेण्याची गरज असल्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(८) श्री. भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुनर्सर्वेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यावधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरु झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर

खाजगी व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदुषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण क्षमतेने सिवेज ट्रिटमेंट प्लांट व तद्नुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दुषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉल मध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

**(९) ॲड. अशोक पवार, सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाणे, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी होणे तसेच झाडाझुडपांनी अनेकांच्या पोटचाऱ्या गाडून टाकणे, सदरचा कालवा हा रोजगार हमी योजनेतून झाला असल्याने प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण होणे गरजेचा असणे, कॅनोलमधील पाणी गळतीचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के होत असून कालव्याच्या मुखातून सद्य स्थितीत ५५० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून टेल भागात अंदाजे ७० ते ९० क्युसेकने (पावसाळ्या व्यतिरिक्त) पाणी मिळणे, यामुळे हेड व टेल या दोन्ही भागातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, टेलच्या भागापर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यासाठी व कॅनोलची गळती रोखण्यासाठी तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी, जलसेतू अस्तरीकरणासाठी, चाऱ्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(४)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, शिरीषदादा चौधरी, अमित झनक, अमिन पटेल व सहसराम कोरोटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

अप्रकाशित प्रत

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सात : **सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हसन मुश्रीफ, अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, रईस शेख, विनोद निकोले, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ.**

**राजेंद्र शिंगणे, श्री. सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील, विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धिरज देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतकरी अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'टप्पा-२' मध्ये १ टक्काही रक्कम खर्च केली नसल्यामुळे मोठी रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, कृषि मंत्री यांनी वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदल्या, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, केंद्र सरकारकडून मनरेगा पंतप्रधान शेतकरी अनुदान योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून तुषार आणि ठिबकचे अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नसणे, "ग्रॉस डोमेस्टीक क्लायमेट रिस्क" या संस्थेच्या अहवालात महाराष्ट्राचाही समावेश असणे, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, कोरोनापश्चात ग्रामीण भागाकडे झालेले स्थलांतर लक्षात घेता स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम देण्यासाठी जलसंधारण, रोपवाटिका, रोजगार हमीच्या कामांबरोबरच ग्रामविकासाच्या विविध योजना आखण्याची आवश्यकता, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, या शेतकऱ्यांवर सरकारकडून

लाठीचार्ज करण्यात आला असणे, पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नाडले जात असताना अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, परिणामी शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली असणे, केंद्र सरकारची किसान ड्रोन अनुदान योजना कागदावरच राहिली असणे, कृषि मालाच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, पीक कर्ज देण्यासाठी बँकांनी हात आखडता घेतला असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थांच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या काळात वादळाचा तडाखा बसून काजू बी आणि काजू झाडांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाची अंमलबजावणी होत नसणे, फळपीक कर्जासाठीच्या वाढीव व्याजामुळे संत्रा व इतर फळपिक उत्पादकांना तोटा सहन करावा लागत असणे, द्राक्षाची कमी झालेली निर्यात, मराठवाड्याप्रमाणे कोकणातही वानरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी धडक मोहिम राबवण्याची आवश्यकता, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदीअभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी झाली नसणे, महाराष्ट्र राज्य दूध महासंघ (महानंद) आर्थिक अडचणीत आला असून याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, लॅम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील पशुधन संकटात आले असणे, राष्ट्रीय अंडी समन्वय समितीकडून अंड्याच्या दरात अवाजवी चढ-उतार होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आला असणे, मच्छिमारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मत्स्यव्यवसायला मत्स्यशेतीचा दर्जा देण्याबाबत होत असलेली मागणी, पर्ससिन मच्छिमार बोटींमुळे निर्माण झालेले मच्छिमारांपुढील संकट, मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामे सुरु करण्याबाबत सरकारची धरसोड वृत्ती, परभणी जिल्ह्यात कंत्राटदाराकडून लाच घेताना जलसंधारण विभागाचा उपविभागीय अधिकारी व लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असणे, व्यवस्थापकीय संचालकांचाही यातील सहभाग उघड झाला असणे, या व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे शेतकरी, शेतमजूर व शेतीवर अवलंबून असलेल्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : डॉ. संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, संजय सावकारे, अनिल बाबर, डॉ.प्रा. अशोक उइके, श्री. राजेश पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, महेंद्र थोरवे, ॲड॰ आकाश फुंडकर, सर्वश्री सुरेश भोळे, जयकुमार रावल, भरतशेट गोगावले, हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, दिलीप बोरसे, योगेश कदम, संतोष दानवे, बबनराव पाचपुते, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री दिलीप लांडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री नितेश राणे, गणेश नाईक, अभिमन्यू पवार, ॲड॰ शहाजीबापू पाटील, सर्वश्री महेश शिंदे, प्रकाश आबिटकर, महेंद्र दळवी, विनोद अग्रवाल, राम सातपुते, जयकुमार गोरे, ज्ञानराज चौगुले, सुभाष देशमुख, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड॰ राहुल कुल, श्री. किसन कथोरे, डॉ. राहुल आहेर, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री हरीष पिंपळे, दादाराव केचे, किर्तीकुमार भांगडीया, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाळे, कृष्णा गजबे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री प्रकाश भारसाखळे, प्रताप अडसड, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री काशिराम पावरा, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, डॉ. तुषार राठोड, श्री. नारायण कुचे, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, महेश चौगुले, गणपत गायकवाड, योगेश सागर, राम कदम, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, राणा जगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याण-शेट्टी, धनंजय गाडगीळ, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, रवि राणा, डॉ. विनय कोरे, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, राजेंद्र राऊत, नामदेव ससाणे, भिमराव केराम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा

अग्रिम प्रत

मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना टाळाटाळ करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु.४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे, परंतू त्याच वेळेस महायुती सरकारने जून २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे, परंतू मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, परंतू महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन, शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, परंतु महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेव्दारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे, परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्हया-जिल्हयांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालीदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहीर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्दयामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पुर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता

अग्रिम प्रत

सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्त्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व

अप्रसिद्ध पत्र

पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (क्रमांक १ व २)**

**(१) श्री.अमित साटम, वि.स.स.**

"मुंबई शहरामध्ये म्हाडा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्विकासित इमारतीतील गाळे वितरणात झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. अमित साटम, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५३८०५ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"दौंड तालुक्यांसह (जि.पुणे) राज्यात मोठया प्रमाणात चिबाड शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत" या विषयावरील ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १०५ मधील प्रश्न क्रमांक ४०४१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**( सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) ( क्रमांक ३ व ४)**

**(३) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत" या विषयावरील श्री.रईस शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१३४८ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

अप्रकाशित प्रत

**(४) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.**

"राज्यातील छोटया शहरात आयटी केंद्र उभारण्याबाबत" या विषयावरील श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १२३ मधील प्रश्न क्रमांक ४३००५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा